महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:डीआरए-०५२२/प्र.क्र.८८/२०२२/जाहिरात दिनांक: ०४ ऑगस्ट, २०२२

**-: शुध्दीपत्रक :-**

**विषय: व्यवस्थापक, (मोठी मुद्रणालये), सामान्य राज्य सेवा, गट-अ, तसेच सहायक व्यवस्थापक, सामान्य राज्य सेवा, गट-ब शासकीय मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय - समतुल्य शैक्षणिक अर्हतेनुसार अर्ज करण्यास मुदतवाढ देणेबाबत**

**संदर्भ : जाहिरात क्रमांक-०५६/२०२२ व ०५७/२०२२**

शासनाच्या, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत शासकीय मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनायाच्या अधिपत्याखालील **व्यवस्थापक (मोठी मुद्रणालये), सामान्य राज्य सेवा, गट-अ तसेच सहायक व्यवस्थापक, सामान्य राज्य सेवा, गट-ब** या संवर्गातील प्रत्येकी एका पदाच्या भरतीकरीता आयोगामार्फत दिनांक २३ जून, २०२२ रोजी जाहिराती (जाहिरात क्रमांक ०५६/२०२२ व ०५७/२०२२) प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. प्रस्तुत दोन्ही जाहिरातीमध्ये सेवा प्रवेश नियमानुसार शैक्षणिक अर्हता नमूद करण्यात आली आहे. सदर शैक्षणिक अर्हतेस खालीलप्रमाणे समकक्ष अर्हता असल्याचे शासनाकडून शासन पत्र क्रमांक: मुलेसा २०१८/प्र.क्र.१७३/उद्योग-४, दिनांक ०१ ऑगस्ट, २०२२ अन्वये आयोगास कळविले आहे:-

| अ. क्र. | सेवा प्रवेश नियमानुसार जाहिरातीमध्ये नमूद शैक्षणिक अर्हता | शासनाने कळविलेली समकक्ष शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| 1 | Degree in Printing Technology in Offset Printing OR Letterpress Printing | (1) Bachelor in Printing Engineering<br>(2) Bachelor of Engineering in Printing Technology<br>(3) Bachelor of Engineering in Print & Media Technology<br>(4) Bachelor of Engineering in Printing & Packaging<br>(5) Bachelor of Engineering in Printing Engineering & Graphic Communication<br>(6) Bachelor of Technology (Printing Technology) |
| 2 | Diploma in Printing Technology in Offset printing OR letterpress Printing | (1) Diploma in Printing Technology (Letter press)<br>(2) Diploma in Printing Technology (Lithography)<br>(3) Diploma in Printing Technology |

२. उपरोक्त समतुल्य अर्हतांचा समावेश करण्यात आल्यामुळे, जाहिरात क्रमाक ०५६/२०२२ तसेच ०५७/२०२२ या दोन्ही जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्याच्या प्रक्रियेस खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज सादर करण्याचा कालावधी | दिनांक ०५ ऑगस्ट, २०२२ ते दिनांक १९ ऑगस्ट, २०२२ |
| २ | ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरण्याकरीता विहित अंतिम दिनांक | दिनांक १९ ऑगस्ट, २०२२ |
| ३ | भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेणे याकरीता विहित अंतिम दिनांक | दिनांक २१ ऑगस्ट, २०२२ |
| ४ | चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ |

**३. जाहिरातींमधील इतर अटी व तरतुदींमध्ये कोणताही बदल नाही.**

४. सदर शुध्दीपत्रक तसेच मूळ जाहिरात क्रमांक ०५६/२०२२ तसेच ०५७/२०२२ आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सह सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

ठिकाण : मुंबई

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
(२) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.